# <u>-: जाहिरात :-</u>

**अपर पोलीस महासंचालक , प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य मुंबई व पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी गट- अ , गट-ब व विधी अधिकारी यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यासाठी विहीत नमुन्यात अर्ज मागविण्यात येत आहे.**

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | विधी अधिकारी गट अ | २ | अपर पोलीस महासंचालक , प्रशिक्षण व खास पथके आणि पोलीस आयुक्त,लोहमार्ग मुंबई कार्यालय - प्रत्येकी एक एक पद |
| २ | विधी अधिकारी गट ब | १ | पोलीस आयुक्त,लोहमार्ग मुंबई |
| ३ | विधी अधिकारी | ५ | पोलीस आयुक्त,लोहमार्ग मुंबई. |

<u>*** टिप :-**</u> वर दर्शविलेल्या पदसंख्येत बदल होण्याची शक्यता असू शकते. त्यामध्ये बदल करण्याचे अधिकार हे सक्षम प्राधिका-यास राहतील.

महाराष्ट्र शासन निर्णय गृह विभाग क्र. अेपीओ- ३१०६/प्र.क्र.२२७/पोल-३ दि. २१०८.२००६ व शासन गृह विभाग क्र. एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल-१० दि. १५.०९.२००६ अन्वये पोलीसांकडुन दाखल होणारे खटले विधीवत दाखल व्हावेत ,त्यासाठी त्यांना योग्य ते वैधानिक सहाय्य मिळावे व गुन्हेगारांना शासन होवुन कायदा व सुव्यवस्था अधिक सक्षम व्हावी , तसेच पोलीस प्रशिक्षण संस्थामध्ये पोलीसांना कायदेविषयक प्रशिक्षण देणे सुलभ व्हावे म्हणुन पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे आस्थापनेवर विधी विषयक अधिका-यांची पदे निर्माण करण्यात आलेली आहेत. त्यापैकी पोलीस आयुकत, लोहमार्ग मुंबई आणि अपर पोलीस महासंचालक , लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या आस्थापनेवर विधी अधिकारी गट-अ , विधी अधिकारी गट-ब व विधी अधिकारी यांची पदे मंजुर करण्यात आलेली आहेत. सदरची पदे शासन निर्णय क्र. एसपीपी २००५/प्र.क्र.२४७/पोल-१० दि. १५.०९.२००६ मध्ये नमुद झालेल्या कार्यपद्धतीनुसार भरण्याकरीता पोलीस आयुक्त, लोहमार्ग यांची " निवड मंडळाचे अध्यक्ष " म्हणुन पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्र. पोमंस/२-अ/३२२८/विअ भरती/२०१५ दि. २३.२.२०१८ नुसार मान्यता दिलेली आहे.

तरी अपर पोलीस महासंचालक , प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य , मुंबई आणि पोलीस आयुक्त , लोहमार्ग मुंबई कार्यालयातील विधी अधिकारी गट-अ यांची कंत्राट पदधतीने पदे भरावयाची असल्याने खालील अटी व शर्ती पुर्ण करणा-या उमेदवारांनी सदर पदाकरीता जाहीरातीत दिलेल्या नमुना फॉर्म मध्ये विनंती अर्ज <u>**दि. १५.०२.२०१९**</u> रोजी पर्यत "पोलीस आयुक्त, लोहमार्ग ´ÖãÓ²Ö±Ô", कार्यालय एरिया मॅनेजर बिल्डींग, ४ था मजला, मध्य रेल्वे गुड यार्ड, पी.डीमेलो रोड,

वाडीबंदर (पुर्व ), मुंबई येथे पोहचेल असे पाठवावेत. तदनंतर प्राप्त झालेल्या विनंती अर्जाचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.



विधी अधिकारी गट - अ , या पदाकरीता मागविण्यात आलेले अर्ज अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाकरीता भरण्यात येणार असुन निवड मंडळाने शिफारस केलेल्या नावांची यादी निवड मंडळाचे अध्यक्ष यांचे मान्यतेकरीता पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य मुंबई यांच्या कार्यालयात सादर करण्यात येणार आहेत.

**करारातील मासिक देय रक्कम :-**

| अ.क्र. | पदनाम | मानधन + दुरध्वनी व प्रवासखर्च |
|---|---|---|
| १ | विधी अधिकारी गट- अ | रु.३०,०००/- + रु. ५०००/- |
| २ | विधी अधिकारी गट - ब | रु.२५,०००/- + रु. ३०००/- |
| ३ | विधी अधिकारी | रु.२०,०००/- + रु. ३०००/- |

**शैक्षणिक अर्हता वयोमर्यादा व अनुभव :- विधी अधिकारी गट- अ**

१. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायदयाचा पदवीधर असावा. तो सनदधारक असावा.

२. विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ०७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३. उमेदवार गुन्हेगारी विषयक , सेवाविषयक , प्रशासनिक अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इ.बाबतीत ज्ञानसंपन्न असेल ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४. उमेदवारास मराठी , हिंदी व इंग्रजी या भाषांचे पुरेसे ज्ञान असले पाहीजे.

५. उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ६२ वर्षापेक्षा जास्त नसेल.

**किंवा**

जी व्यक्ती शासकीय सेवेत असताना प्रत्यक्षपणे विधीविषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी , प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याचप्रमाणे मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल. सदर व्यक्तीस नियुक्तीबाबतच्या अन्य अटी लागु राहतील. शासकीय सेवेत कार्यरत व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

**शैक्षणित अर्हता व वयोमर्यादा :- विधी अधिकारी गट- ब व विधी अधिकारी**

**१. शैक्षणिक अर्हता :**

उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापिठाचा कायद्याचा पदवीधर असावा व सनदधारक असावा.

उमेदवारास मराठी, हिन्दी व इंग्रजी या भाषेचे पुरसे ज्ञान असणे आवश्यक आहे.

**२. वयोमर्यादा :**

अ) विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय दिनांक - **१५/०२/२०१९** रोजी **६०** वर्षापेक्षा जास्त नसावे.

**अनुभव :-**

१. विधी अधिकारी गट- ब व विधी अधिकारी या दोन्ही पदासाठी वकीली व्यवसायाचा किमान ०५ वर्षांचा अनुभव आवश्यक राहील.

२. उमेदवार गुन्हेगारी विषयक, सेवा विषयक, प्रशासनिक अशा सर्व प्रकाराच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशी इत्यादी बाबतीत ज्ञान संपन्न असावा. ज्यामुळे कायदेविषयक कारवाई तो कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

**किंवा**

३. जी व्यक्ती शासकीय सेवेत असतांना प्रत्यक्ष पणे विधी विषयक कामकाज हाताळत होती आणि ज्या व्यक्तीस गुन्हेगारी प्रशासकीय व सेवाविषयक कायद्यांविषयक सखोल ज्ञान असेल त्याच प्रमाणे मा.सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार प्रस्थापित समकालीन कायद्याचे ज्ञान असेल अशा व्यक्तीची शासकीय सेवा ही केवळ अनुभवासाठी ग्राहय धरण्यात येईल, सदर व्यक्तीस नियुक्ती बाबतच्या अन्य अटी लागू राहतील, शासकीय सेवेत कार्यरत असलेली व्यक्ती निवडीस अपात्र असेल.

⇨ **विधी अधिकारी गट-अ / गट- ब व विधी अधिकारी पदाची कर्तव्य व जबाबदा-या :-**

१. कार्यालयाकडे प्राप्त होणा-या सर्व प्रकारच्या कायदेविषयक बाबींबाबत/न्यायालीन प्रकरणी सल्ला देणे व न्यायालयीन प्रकरणे हाताळणे.

२. सेवा विषयक / प्रशासकीय बाबी / विभागीय चौकशी तथा समकालीन कायदयाची प्रस्थापित स्थिती याबाबत सर्व प्रकरणी सल्ला देणे व ती प्रकरणे हाताळणे.

३. प्रलंबित न्यायालयीन प्रकरणे तत्परतेने निकाली काढण्यासाठी सरकारी वकीलाकडे पाठपुरावा करणे, जेथे शासन प्रतिवादी आहे अशी प्रकरणे सादर करावयाची प्रतिज्ञापत्र संबंधित अधिका-यांच्या मदतीने

तयार करणे .



४. शपथ पत्राचा मसुदा तयार करणे व त्यास सक्षम प्राधिका-याची मान्यता घेऊन न्यायालयात विहित मुदतीत सादर होईल हे पहाणे.

५. जेथे शासनाच्या विरोधात न्यायालयाने निकाल दिलेला आहे अशा प्रकरणामध्ये न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास करुन तद्अनुषंगाने अपिल दाखल करण्याच्या संदर्भात उचित कार्यवाही करणे.

६. अपील करणे योग्य असल्यास व तसा निर्णय झाल्यास अपीलाचा मसुदा तयार करुन तो संबधित वकिलाकडे पाठविणे व अपिलाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत पाठपुरावा करणे.

७. विधीविषयक कामकाजाबाबत वेळोवेळी नेमुन दिलेले कार्य विहीत मुदतीत पार पाडणे.

८. पोलीस स्टेशन मध्ये प्रथम खबरी अहवाल दाखल करण्यास योग्य ती मदत करणे.

**अटी व शर्ती :-**

१ मा.सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली येथे दाखल असलेल्या विशेष हक्क याचिका क्रमांक १९००८१९००९ महाराष्ट्र शासन व इतर विरुध्द अनिता आणि इतर व विशेष हक्क याचिका क्रमांक २०१८२/१२ श्री नारायण तुकाराम पंत जोशी आणि इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर यामधील अंतिम निर्णयाच्या अधिन राहुन विधी अधिकारी गट ब व विधी अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती राहील.

२ सदर पदांची नेमणूक ही पुर्णत: कंत्राटी पध्दतीने असेल. उमेदवाराला शासकीय कर्मचारी/अधिकारी म्हणुन गणले जाणर नाही.

३ उमेदवाराची निवड लेखी परिक्षा तसेच मुलाखतीद्वारे करण्यात येईल. तसेच त्याबाबत आपणास लेखी /भ्रमणध्वनीद्वारे कळविण्यात येईल.

४ उमेदवाराला मुलाखतीसाठी कोणताही प्रवास खर्च देण्यात येणार नाही.

५ सदर नेमणुका या करार पध्दतीने प्रथमत: ११ महिन्यांसाठी करण्यात येतील. ११ महिन्यानंतर आवश्यक असल्यास करारनाम्याची मुदत वेळोवेळी जास्तीत जास्त २ वेळा ११ महिन्यांकरिता वाढविता येईल मुदतवाढीसह ३ वेळा नियुक्ती दिल्यानंतरही अशा उमेदवाराची पुनश्च नियुक्ती करणे आवश्यक आहे असे सक्षम प्राधिका-याचे मत झाल्यास त्या उमेदवारास पुनश्च निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल .

६ निवड केलेला उमेदवार ११ महिन्यांच्या कराराच्या कालावधीत वकीली व्यवसायाशी संबधित कोणत्याही प्रकारचे खाजगी काम / व्यवसाय नियुक्ती प्राधिका-याच्या लेखी परवानगी शिवाय करु शकणार नाही.

जर नियुक्ती प्राधिका-याने सदर बाबतची परवानगी नाकारली असेल आणि परवानगी नाकारल्यावरही उमेदवाराने खाजगी व्यवसाय सुरु ठेवला असेल व तसे करण्याने शासनाच्या कामात व्यत्यय किंवा आर्थिक नुकसान होत असेल तर अशा उमेदवारांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.व नियमानुसार त्यांचे विरुध्द कारवाई करण्यात येईल.

७ नियुक्त केलेल्या उमेदवारास या कार्यालयामार्फत देण्यात येणारा करारनामा (Agreement ) भरणे अनिवार्य राहील. करार पध्दतीने नेमणुक करण्यात येणा-या अधिकारी / कर्मचा-यांना एकत्रित वेतन आणि अनुज्ञेय दुरध्वनी व प्रवास खर्चाव्यतीरिक्त (उपरिनिर्दिष्ट मर्यादेपेक्षा ) इतर कोणतेही भत्ते अनुज्ञेय होणार नाही.

८ उमेदवाराने सोबत दिलेल्या विहित नमुन्यातील अर्ज लिफाफ्यात भरुन लिफाफ्यावर उजव्या बाजुला ठळक अक्षरात विधी अधिकारी गट- अ / गट-ब आणि विधी अधिकारी या पदासाठी अर्ज असे नमुद करुन दिनांक **१५/०२/२०१९** पर्यंत पोलीस आयुक्त , लोहमार्ग मुंबई , एरिया मॅनेजर बिल्डींग, ४ था मजला, मध्य रेल्वे गुडस यार्ड, पी.डीमेलो रोड, वाडीबंदर (पु.) मुंबई ४०० ०१० या पत्यावर पोहाचेल याची दक्षता घ्यावी. दिनांक **१५/०२/२०१९** नंतर या कार्यालयात प्राप्त झालेल्या अर्जाचा विचार करण्यात येणार नाही. अर्जासोबत पत्रव्यवहाराकरीता उमेदवाराचा पत्ता असलेले दोन लिफाफे जोडावेत.

९ उमेदवाराने वर विहीत केलेल्या शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा व अनुभव व अटी अर्ज करतेवेळी पुर्ण केलेल्या असणे आवश्यक आहे.

१० अर्जासोबत २.५ cm × २.५cm आकाराचे सध्याचे काढलेले दोन रंगीत फोटो जोडावेत.

## अर्जदाराने द्यावयाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री / सौ / कु. ---------------------------------------------------------------------- या व्दारे प्रतिज्ञापुर्व असे जाहीर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपुर्वक तसेच विश्वासपुर्वक दिले असुन ती खरी आहे जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांनुसार व शैक्षणिक अर्हतेनुसार मी पात्र आहे. अर्जात नमुद केलेली कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळुन लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी निवड / नियुक्ती रद्द केल्यास त्याबाबत माझी काहीही तक्रार राहणार नाही. अर्जात नमुद केलेली माहिती खोटी अथवा चुकीची असल्यास त्याची पुर्णपणे जबाबदारी माझ्यावर राहील व त्याबाबतीत माझ्याविरुध्द कायदेशिर कारवाईस मी पात्र राहीन. तसेच मी भरती प्रकियेमध्ये त्याही प्रकारची वशीलेबाजी किंवा गैरप्रकारांचा अवलंब केल्यास मी अपात्र ठरेन.

**ठिकाण**

**दिनांक**

**अर्जदाराची सही**

**(दिनांकासह)**

**सोबत : अर्जात नमुद केलेल्या बाबींच्या आवश्यक प्रमाणपत्राच्या प्रमाणित केलेल्या छायांकीत प्रती .**

## अर्जाचा नमुना

-----------------------------------------पदाकरीता अर्ज

कार्यालयीन उपयोगासाठी.

**१. अर्ज क्रमांक** : ☐ ☐ ☐ ☐ ☐

**२. अर्ज स्वीकारल्याचा दिनांक** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

**३. अर्ज स्वीकारल्याची स्वाक्षरी (दिनांकासह )** : ---------------------------------------------------

**सुचना** : १. अर्जदाराने माहिती मराठीत लिहावी व दर्शविलेल्या ठिकाणीच माहिती इंग्रजीत लिहावी आवश्यक नसेल तेथे खोडावे.

२. अर्जातील अंक फक्त इंग्रजीत लिहावे.

### अ) अर्जदाराची वैयक्तिक माहिती

**१. अर्जदाराचे संपुर्ण नांव** : आडनाव नांव वडिलांचे / पतीचे नांव

मराठीत :

इंग्रजीत :

**२. पत्रव्यहाराचा पत्ता :**

तालुका जिल्हा : पीनकोड : ☐☐☐☐☐☐

**३. कायमचा पत्ता :**

तालुका जिल्हा पीनकोड ☐☐☐☐☐☐

**४. दुरध्वनी क्रमांक :** लॅन्डलाईन : ---------------------- मोबाईल क्रमांक : ----------------------

**५. जन्मदिनांक** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐ जन्मस्थळ :----------------------

दिवस महिना वर्ष.

**६. दिनांक १५.२.२०१९ रोजीचे वय :** ☐☐ ☐☐ ☐☐☐☐

दिवस महिना वर्ष

**७. लिंग** : पुरुष ☐ / महिला ☐

**८. धर्म : ----------------------** **जात : ------------------------**

**९. क्रीमीलीअर आहे वय** : होय ☐ नाही ☐

**१०. महाराष्ट्र राज्याचे रहिवासी आहात का** ? होय ☐ नाही ☐

**योग्य असेल त्या ठिकाणी ( √) अशी खुण करावी.**

### ब अर्जदाराची शैक्षणिक माहिती

**११. शैक्षणिक अर्हता**

| शिक्षण | शैक्षणिक संस्थेचे नाव (विद्यालय / महाविद्यालय ) | बोर्ड / विद्यापीठ | उत्तीर्ण झाल्याचा दि. | मिळालेले गुण | मिळालेली टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इ.१० वी ) | | | | | |
| २.पदवी | | | | | |
| ३. विधी पदवी | | | | | |

**१२. इतर शैक्षणिक अर्हता**

संगणक प्रशिक्षीत आहे काय ? होय ☐ नाही ☐

**१३. अर्जदाराची इतर माहिती**

अ) सनद घेतल्याचा दिनांक

ब) उमेदवाराने स्वत: हाताळलेल्या केसेसचा तपशिल

| अ. क्र | न्यायालयाचे नाव | केसेसचा प्रकार | केसेसच्या संख्या |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |

*** टिप : वकीली व्यवसायाने अनुभवाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे.**

१४-अ अर्जदारास यापुर्वी कोणत्याही अपराधाबाबत कधीही अटक करण्यात / स्थानबध्द करण्यात / दंड करण्यात / सिध्दोषी ठरविण्यात आले आहे काय, किंवा लोकसेवा आयोगा कडून त्यांच्या परिक्षाना / निवडीना बसण्यास मनाई करण्यात आली आहे काय , किंवा अनर्ह ठरविण्यात आले आहे काय,किंवा कोणत्याही विद्यापिठाकडून किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकणाकडुन / संस्थेकडून कोणत्याही परिक्षेस बसण्यास मनाई करण्यातआली आहे काय / काढुन टाकण्यात आले आहे काय ?

होय ☐

नाही ☐

१४-ब हा अर्ज भरते वेळी कोणत्याही न्यायालयात , विद्यापिठात किंवा इतर कोणत्याही शैक्षणिक प्राधिकणात / संस्थेत उमेदवाराविरुध्द कोणतेही प्रकरण प्रलंबित आहे काय ?

होय ☐

नाही ☐

( १४- अ किंवा १४ - ब चे उत्तर होय असेल तर हा अर्ज भरताना सदर खटला, अटक ,स्थानबध्दता ,दंड, दोषसिध्दी, शिक्षादेश इत्यादींचा संपुर्ण तपशिल आणि न्यायालय / विद्यापिठ / शैक्षणिक प्राधिकरणात इत्यादी ठिकाणी प्रलंबित असलेल्या प्रकरणांचे स्वरुप स्पष्ट करावे.

## -: जाहिरात :-

## पोलीस आयुक्त, लोहमार्ग कार्यालय, मुंबई

अपर पोलीस महासंचालक प्रशिक्षण व खास पथके , महाराष्ट्र राज्य , मुंबई आणि पोलीस आयुक्त लोहमार्ग मुंबई यांच्या आस्थापनेवरील विधी अधिकारी गट-अ , गट-ब व विधी अधिकारी यांची खालील पदे कंत्राटी पध्दतीने भरणेकरीता विहित नमुन्यांत अर्ज मागविण्यांत येत आहेत.

---

| अ.क्र. | पदनाम | पदसंख्या | नियुक्तीचे ठिकाण |
|---|---|---|---|
| ०१. | विधी अधिकारी गट अ | २ | अपर पोलीस महासंचालक , प्रशिक्षण व खास पथके / पोलीस आयुक्त,लोहमार्ग मुंबई |
| ०२. | विधी अधिकारी गट ब | १ | पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई |
| ०३. | विधी अधिकारी | ५ | |

सदर पदांकरीताचे करार वेतन, शैक्षणीक अर्हता, वयोमर्यादा, अनुभव, कर्तव्य व जबाबदाऱ्या अटी व शर्ती, तसेच विहीत अर्जाचा नमुना, अशी तपशीलवार माहिती www.mumbairlypolice.gov.in या संकेत स्तळावर (वेबसाईटवर) उपलब्ध असून मागणी केल्यास "पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई, कार्यालय एरिया मॅनेजर बिल्डींग, ४ था मजला, मध्य रेल्वे गुड यार्ड, पी.डीमेलो रोड, वाडीबंदर (पुर्व ), मुंबई या पत्त्यावर उपलब्ध केली जाईल.

टीप :- १. सदर पदांकरीता मागविण्यात आलेले विहीत नमुन्यातील अर्ज दिनांक **१५.०२.२०१९** पर्यंत स्विकारले जातील. त्यानंतर प्राप्त अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२ सदर पदांची नेमणूक ही पूर्णत: मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीची असल्याने उमेदवार शासकीय कर्मचारी/अधिकारी म्हणून गणला जाणार नाही.

(निकेत कौशिक)
पोलीस आयुक्त, लोहमार्ग मुंबई